पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-५
सभावृत्तांत

दि.- ६/८/२०१४ वेळ -सकाळी १२:०० वाजता

------------------- ------------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.६/८/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.जम सोनाली पोपट सभापती
२) मा.ननवरे जितेंद्र बाबा
३) मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
४) मा.भोसले राहूल हनुमंतराव
५) मा.पालांडे सुजाता सुनिल
६) मा. सौ.पानसरे अमिना महंमद
७) मा.गिता सुशिल मंचरकर
८) मा.शितोळे शैलजा बाबुराव
९) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०)मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
११)मा.प्रशांत शितोळे
१२)मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१३) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१४) मा.गायकवाड संध्या सुरदास
१५)मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१६)मा.मोटे किरण बाळासाहेब
१७) मा.संजय केशवराव काटे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-प्रभाग अधिकारी, मा.खाबडे-कार्यकारी अभियंता, विदयुत, मा.खरात- कार्यकारी अभियंता, पापु, जावळे- उपअभियंता पापु, श्री.सोनवणे- उपअभियंता,विदयुत, श्री.दिलीप धुमाळ -उपअभियंता,विदयुत,श्री.शिंदे- उपअभियंता, स्थापत्य श्री.वाईकर- उपअभियंता स्थापत्य , श्री.अकबर शेख- कनिष्ठ अभियंता वि, श्री.रविंद्र भोकरे- सहा.आरोग्याधिकारी, श्री.भोसले - उद्यान निरीक्षक, श्री.कामत- सहा.उदयान निरीक्षक हे अधिकारी उपस्थित होते.

------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील  ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक २) सन १४-१५ च्या अर्थसंकल्पातील क क्षेत्रीय
कार्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये फेरबदल करणेबाबत-
मा.सुजाता पालांडे,मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव.

विषय  क्रमांक-३) आ.क्र.२२ कासारवाडी आरक्षणास कै.लालबहादूर शास्त्री
क्रीडांगण असे नामकरण करणेबाबत-मा.किरण
मोटे,मा.ओव्हाळ रमा नितीन यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-४) स्वातंत्र्य सैनिक कै.शेठ श्री.चंद्रकांत सुरजमल लुंकड पथ या
नावाचे फल्क बसविण्याबाबत-मा.ओव्हाळ रमा
नितीन,मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) कनिष्ठ अभियंता वि पदाचा अतिरिक्त पदभार देणेबाबत-
मा.प्रशांत शितोळे,मा.संजय काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-६) तारतंत्री पदाचा वि  अतिरिक्त पदभार देणेबाबत-मा.प्रशांत
शितोळे,मा.संजय काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-७) नामकरण करणेबाबत- मा.अतुल शितोळे, मा.सौ.सुषमा
तनपुरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-८) फुगेवाडी व दापोडी उड्डाणपुला जवळ कमान बांधण्याबाबत-
मा.संध्या गायकवाड,मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-९) फुगेवाडी येथे कमान बांधणेबाबत-मा.संध्या
गायकवाड,मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-१०) फुगेवाडी येथे व्यायामशाळा  बांधणेबाबत-मा.संध्या
गायकवाड,मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-११) दुर्गादेवी भजनी मंडळ सेवानगर फुगेवाडी यांना जागा
देण्याबाबत-मा.संध्या गायकवाड,मा.शकुंतला बनसोडे यांचा
प्रस्ताव.

विषय क्रमांक-१२) नामकरणाबाबत-मा.प्रशांत शितोळे,मा.जितेंद्र ननावरे यांचा
प्रस्ताव.

--------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली—

सुचक- मा.किरण मोटे                    अनुमोदक- मा.रमा ओव्हाळ

मा.नानासाहेब शितोळे माजी महापौर यांचे तसेच आंबेगाव तालुक्यातील माळीण गावावर अचानक झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या दुर्घटनेमुळे मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीस श्रध्दांजली वाहणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

---------

मा.सभापती- सर्वांनी श्रध्दांजली वाहणेसाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.
( सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

---

अ ) दि.४/६/२०१४ , ३०/६/२०१४ व दि. २/७/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.३ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब ) दि.२/७/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.४ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----

ठराव क्रमांक- ६४ विषय क्रमांक- १
दिनांक- ६/८/२०१४ विभाग- क क्षे.का.विदयुत
सुचक-मा. संजय काटे अनुमोदक-मा.शैलजा शितोळे
संदर्भ- मा.क क्षेत्रीय अधिकारी यांचे जा.क्र.कक्षे/वि/जा/५६१/२०१४ दि.१९/०७/२०१४

मा.क क्षेत्रीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे---
क क्षेत्रीय कार्यालयाचे विदयुत विभागाचे सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकातील महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ नुसार क क्षेत्रीय कार्यालय,विदयुत विभागातील हायड्रोलिक शिडया / वाहने भाडे तत्वावर पुरविणे या लेखाशिर्षावर करणेत आलेली तरतुद र.रु.७०,००,०००/- मधुन अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर र.रु. २,००,०००/- तरतुद वर्ग करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक- ६५ विषय क्रमांक- २
दिनांक- ६/८/२०१४ विभाग-
सुचक- मा.सुजाता पालांडे अनुमोदक- मा.गिता मंचरकर
संदर्भ- मा.सुजाता पालांडे,मा.गिता मंचरकर यांचा प्रस्ताव.

क क्षेत्रीय कार्यालयामध्ये सन २०१४-१५ च्या अंदाजपत्रकामध्ये कामांच्या तरतुदीमध्ये सोबतचे प्रपत्र “अ” प्रमाणे फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक- ६६ विषय क्रमांक- ३
दिनांक- ६/८/२०१४ विभाग-
सुचक- मा.किरण मोटे अनुमोदक- मा. रमा ओव्हाळ
संदर्भ- मा.किरण मोटे,मा.ओव्हाळ रमा नितीन यांचा प्रस्ताव.

कासारवाडी येथील आ.क्र.२२ येथे नव्याने बनविणेत आलेल्या मैदानास “लालबहाद्दूर शास्त्री क्रीडांगण” असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक- ६७ विषय क्रमांक- ४

दिनांक- ६/८/२०१४ विभाग-

सुचक- मा.रमा ओव्हाळ अनुमोदक- मा. अमिना पानसरे

संदर्भ- मा.ओव्हाळ रमा नितीन,मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

स्वातंत्र्य सैनिक कै.शेठ श्री.चंद्रकांत सुरजमल लुंकड यांचा जन्म दि.७ डिसेंबर १९२४ साली पुण्यामध्ये झाला त्यांना महाराष्ट्रभर शासनातर्फे दि.१ मे १९८४ रोजी स्वातंत्र्य सैनिक सन्मान पत्राने गौरविण्यात आले. त्यांचा मृत्यू ३१ मे १९९४ रोजी राहत्या घरी झाला त्याच्या पश्चिमेस म्हणजेच स्वामी विवेकानंद शाळेसमोर हा फलक लावणेत यावा. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक- ६८ विषय क्रमांक- ५

दिनांक- ६/८/२०१४ विभाग-

सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा. संजय काटे

संदर्भ- मा.प्रशांत शितोळे,मा.संजय काटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मनपाचे क क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत विदयुत विभागातील जे कर्मचारी स्थायी आस्थापनेवर वीजतंत्री पदावर काम करीत आहेत त्या कर्मचा-यांकडे कनिष्ठ अभियंता विदयुत पदांकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता आहे अशा कर्मचा-यांना मनपाच्या रिक्त पदांवरील कनिष्ठ अभियंता (वि) या पदाचा अतिरिक्त पदभार देणेची कार्यवाही करणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक- ६९ विषय क्रमांक- ६

दिनांक- ६/८/२०१४ विभाग-

सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा. संजय काटे

संदर्भ- मा.प्रशांत शितोळे,मा.संजय काटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मनपाचे क क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत विदयुत विभागातील जे कर्मचारी मदतनीस / मजुर इ. पदावर स्थायी आस्थापनेवर काम करीत आहेत त्या कर्मचा-यांकडे तारतंत्री या पदांकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता आहे अशा कर्मचा-यांना मनपाच्या रिक्त पदांवरील तारतंत्री या पदावर शासनाकडील नियमानुसार अतिरिक्त पदभार देणेची कार्यवाही त्वरीत करणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक- ७० विषय क्रमांक- ७
दिनांक- ६/८/२०१४ विभाग-
सुचक- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक- मा. अतुल शितोळे
संदर्भ- मा.अतुल शितोळे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव.

सांगवी येथील ग्रामदैवत वेताळ महाराज मंदीरा शेजारी पवना नदी किनारी गणेश विसर्जन घाट असून त्या घाटास **"ग्रामदैवत वेताळ महाराज घाट"** असे नामकरण करणेस मान्याता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक- ७१ विषय क्रमांक- ८
दिनांक- ६/८/२०१४ विभाग-
सुचक- मा.संध्या गायकवाड अनुमोदक- मा. शकुंतला बनसोडे
संदर्भ- मा.संध्या गायकवाड,मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

वॉर्ड क्र.६२ मधील फुगेवाडी-दापोडी उड्डाणपुलाजवळून जो रस्ता फुगेवाडी,संजयनगरमध्ये जात आहे त्याठिकाणी कमान बांधणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक- ७२ विषय क्रमांक- ९
दिनांक- ६/८/२०१४ विभाग-
सुचक- मा.संध्या गायकवाड अनुमोदक- मा. शकुंतला बनसोडे
संदर्भ- मा.संध्या गायकवाड,मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

वॉर्ड क्र.६२ फुगेवाडी येथे मेगामार्ट विरुध्द दिशेला जो फुगेवाडी मध्ये रस्ता जात आहे त्याठिकाणी कमान बांधणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक- ७३ विषय क्रमांक- १०
दिनांक- ६/८/२०१४ विभाग-
सुचक- मा.संध्या गायकवाड अनुमोदक- मा. शकुंतला बनसोडे
संदर्भ- मा.संध्या गायकवाड,मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

वॉर्ड क्र.६२ मधील ओंकारनगर फुगेवाडी येथील रामभाऊ काटे पुलाखाली व्यायामशाळा बांधणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- ७४ विषय क्रमांक- ११
दिनांक- ६/८/२०१४ विभाग-
सुचक- मा.संध्या गायकवाड अनुमोदक- मा. शकुंतला बनसोडे
संदर्भ- मा.संध्या गायकवाड,मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

वॉर्ड क्र.६२ सेवानगर फुगेवाडी येथील जुने वाचनालय हे बंद असून ते सध्या मोकळेच आहे तेथे दुर्गादेवी भजनी मंडळाच्या महिला भजन करीत असतात तरी सदर मंडळास भजन करण्याकरिता जागा विनामुल्य देणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक- ७५ विषय क्रमांक- १२
दिनांक- ६/८/२०१४ विभाग-
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा. जितेंद्र ननावरे
संदर्भ- मा.प्रशांत शितोळे,मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव.

मौजे सांगवी येथील पिंपरी चिंचवड मनपाचे ताब्यात असलेली सांगवी गावठाण येथील व्यायामशाळेचे इमारतीमध्ये मनपाचे ग्रंथालय असून सदर ग्रंथालय अनेक वर्षापासून चालू आहे सदर ग्रंथालयास "**स्व.नानाभाऊ कोंडीबा पवार**" असे नामकरण करणेस तसेच सांगवी येथील स.नं.६७ मधील पुर्व-पश्चिम १८ मी. फेमस चौक ते मिलटरी हद्द पर्यंतच्या रस्त्यांस "**स्व.बाबासाहेब श्रीपतराव ढमाले**" असे नामकरण करणेस तसेच मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(जम सोनाली पोपट)
सभापती
क क्षेत्रीय समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय भोसरी २६
जा.क्र.कक्षेका/कावि/ ७८७ /२०१४दि. ११ / ८ /२०१४



प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क क्षेत्रीय समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

---

क क्षेत्रीय समिती सभा ठराव क्रमांक ६५ दिनांक ६/८/२०१४

**प्रपत्र “अ”**

| अ. क्. | कामाचे नांव | लेखाशिर्ष | प्रभाग क्र. | पान क्र. | अ.क्र. | सन १४-१५ ची तरतुद | वर्गीकरण व आवश्यकतेनुसार होणारी वाढ | घट | एकुण आवश्यक तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.३८ नेहरुनगर विठ्ठलनगर या भागात पाणीपुरवठा देखभाल दुरुस्ती कामे करणे. | प्रभागस्तरीय किरकोळ दुरुस्तीची कामे | ३८ | ८३५ | ७४ | ० | ९५०००/- | ० | ९५०००/- |
| २ | क प्रभागात ठिकठिकाणी टँकरचे पाणीपुरवठा करणे. | पाणीपुरवठा किरकोळ दुरुस्ती | प्रभागस्तरीय | ११४४ | ९ | ४००००० | ० | ९५०००/- | ३०५०००/- |
| | **एकुण** | | | | | ४००००० | ९५००० | ९५००० | ४००००० |



प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क **क्षेत्रीय** समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका